
24 JAN 2024

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# धुक्याने लपेटले शहर...



कोल्हापूर : जानेवारीचा शेवटचा आठवडा सुरू असला तरी शहर आणि ग्रामीण परिसरात थंडीचा कडाका अजूनही दिसून येत आहे. थंडीबरोबर धुक्याच्या दुलईने शहर परिसर लपेटून गेला आहे. शिवाजी विद्यापीठाचा हा परिसर.

24 JAN 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञानाची प्रक्रिया भाषेपासूनच सुरू होते

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; विद्यापीठातील एक दिवसीय कार्यशाळेचे उद्‌घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ज्ञानाची प्रक्रिया भाषेपासूनच सुरू होते, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग व कोल्हापूर जिल्हा मराठी अध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त मराठी विषय अध्यापनातील सर्जनशील कौशल्य या एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्‌घाटन सत्रात अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, बालवाडी ते विद्यापीठ हे दोन शिक्षणातील बिंदू गुणात्मक पद्धतीने जोडण्यासाठी अशा कार्यशाळा व संवाद महत्त्वाचे ठरतील. प्रत्येक टप्प्यावर विद्यार्थी केंद्रित शिक्षणपद्धती अधिकाधिक विकसित करण्यासाठी या कार्यशाळा निश्चितपणे उपयुक्त आहेत. जिल्हा मराठी अध्यापक संघ कोल्हापूरचे अध्यक्ष



**कोल्हापूर : मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, नीती बडवे, सुचिता पडळकर आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)**

राजेंद्र पाटील यांनी मनोगतात अध्यापक संघाच्या कार्याचा आढावा घेतला. पहिल्या सत्रात, 'भाषिक कौशल्य आणि मराठीचे चलन-वलन' या विषयाच्या अनुषंगाने नीती बडवे यांनी मांडणी केली. दुसऱ्या सत्रात, 'भाषिक अनुभव देणे म्हणजे काय' या विषयावर सुचिता पडळकर यांनी मार्गदर्शन केले.

तिसऱ्या सत्रात, 'भाषा अध्यापनातील विविध दृष्टिकोन' या विषयाची दीपक मेंगाणे यांनी माहिती दिली. प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

# नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात नेताजी सुभाषचंद्र बोस व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ.विलास शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी-विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
लोकमत

# भाषेपासूनच सुरू होते ज्ञानाची प्रक्रिया : कुलगुरू शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ज्ञानाची प्रक्रिया भाषेपासूनच सुरू होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते विद्यापीठातील मराठी विभाग आणि कोल्हापूर जिल्हा मराठी अध्यापक संघ यांच्यातर्फे आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त 'मराठी विषय अध्यापनातील सर्जनशील कौशल्य' या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात बोलत होते.

यावेळी जिल्हा मराठी अध्यापक संघाचे अध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी मार्गदर्शन केले. पहिल्या सत्रात 'भाषिक कौशल्य आणि मराठीचे चलनवलन' या विषयाच्या अनुषंगाने नीती बडवे यांनी मांडणी केली. दुसऱ्या सत्रात 'भाषिक अनुभव देणे म्हणजे काय' या विषयाच्या अनुषंगाने सुचिता पडळकर यांनी मांडणी केली. यावेळी प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. डॉ. रणधीर शिंदे, सुस्मिता खुटाळे, डॉ. सुखदेव एकल उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
लोकमत

# सुभाषचंद्र बोस, ठाकरे यांची जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी केली.

कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन केले. कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. आर. एस. कटकार यावेळी उपस्थित होते.

24 JAN 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. विजय फुलारी यांची निवड

## कुलगुरूपदाची संधी मिळालेले शिवाजी विद्यापीठातील तिसरे प्राध्यापक; शिक्षण क्षेत्रातील ३६ वर्षांचा अनुभव

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. विजय फुलारी यांची निवड झाली. शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागात ते प्राध्यापकपदी कार्यरत असून, मटेरियल सायन्समधील संशोधनात त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांना शिक्षणक्षेत्रातील ३६, तर संशोधनातील कामाचा ३२ वर्षांचा अनुभव आहे. विद्यापीठात कार्यरत असताना कुलगुरूपदावर काम करण्याची संधी मिळालेले ते तिसरे प्राध्यापक ठरले आहेत. ते मुळचे सांगोला येथील आहेत.

डॉ. फुलारी यांनी पंढरपूर येथील केबीपी कॉलेजमधून सन १९८५ मध्ये भौतिकशास्त्र विषयातून बी.एस्सी. पदवीचे शिक्षण पूर्ण केले. पुढे १९८७ मध्ये त्यांनी शिवाजी विद्यापीठातून एम.एस्सी, तर पीएच.डी.ची पदवी १९९९ मध्ये मिळविली. त्यांनी शिक्षण क्षेत्रातील कारकीर्द अकलूज येथील शंकरराव मोहिते कॉलेजमधून १९८७ पासून सुरू केली. ऑगस्ट २००० मध्ये ते रीडर



डॉ. विजय फुलारी

आणि २००८ मध्ये ते प्रोफेसर (प्राध्यापक) झाले. त्यांनी भौतिकशास्त्र विभागप्रमुख, युसीक-सीएफसी, फिजिक्स ऑफ मॉर्डन ऑपस्टिक्स विभागाचे प्रमुख म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत २४ विद्यार्थ्यांनी पीएच.डी.चे संशोधन, तर ४०० जणांनी एम.एस्सी. अभ्यासक्रमातील संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. विद्यापीठाच्या अभ्यास मंडळासह शैक्षणिक, प्रशासकीय कामकाजातील विविध समित्यांवर डॉ. फुलारी यांनी काम केले आहे.

इंडो-कोरियन संयुक्त संशोधन प्रकल्पात त्यांनी योगदान दिले आहे. दक्षिण कोरिया, तैवानमधील विद्यापीठांसमवेत त्यांनी संशोधन केले आहे.

### विद्यापीठाच्या परंपरेला साजेसे काम करतील

'शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या डॉ. विजय फुलारी यांची कुलगुरूपदी निवड झाल्याचा आनंद आहे. त्यांच्या निवडीने विद्यापीठातील एकूण तीन शिक्षक आता कुलगुरू झाले आहेत. त्यात मी आणि होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत आहोत आणि आता औरंगाबाद विद्यापीठात डॉ. फुलारी काम करणार आहेत. ते निश्चितपणे विद्यापीठाच्या परंपरेला साजेसे काम करतील', अशी प्रतिक्रिया शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली.

### 'नॅक', अॅकॅडमिक ऑडिटमध्ये योगदान

डॉ. फुलारी यांनी नॅक आणि अकॅडमिक अॅन्ड अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑडिटसाठी विविध विद्यापीठांचे मार्गदर्शक म्हणून काम केले आहे. त्यात वारंगळ तेलंगणा विद्यापीठ, उस्मानिया विद्यापीठ हैदराबादसह राजकोट, ग्वाल्हेर, चिकमंगळूर, जबलपूर, आदी विद्यापीठांसह शिवाजी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

### संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. मिलिंद बारहाते

राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी आज नागपूर येथील सी. पी. अँड बेरार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद अरविंद बारहाते यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती केली आहे. तसेच डॉ. सुनील गंगाधर भिरूड यांची शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे तंत्रज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरुपदावर नियुक्ती केली आहे. डॉ. भिरूड हे वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्थेत संगणक अभियांत्रिकी व माहिती तंत्रज्ञान विभागात प्राध्यापक पदावर कार्यरत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
लोकमत

# कोल्हापूरचे विजय फुलारी 'बामू'चे कुलगुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी डॉ. विजय जनार्दन फुलारी यांची छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या (बामू) कुलगुरुपदी नियुक्ती केली आहे. डॉ. फुलारी हे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे वरिष्ठ प्राध्यापक असून ते भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख होते.



-/ वृत्त महाराष्ट्र

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
पुढारी


# विद्यापीठात नेताजी बोस, ठाकरेंना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवारी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव, अधिष्ठाता महादेव देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
लोकमत

# डॉ. बारहाते अमरावती विद्यापीठाचे, डॉ. विजय फुलारी 'बामू'चे कुलगुरू


डॉ. मिलिंद बारहाते


डॉ. सुनील भिरुड

- डॉ विजय फुलारी हे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे वरिष्ठ प्राध्यापक असून ते भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख होते. फुलारी हे मूळचे आलेगाव (ता. सांगोला)येथील रहिवासी आहेत. १९८७ ला त्यांनी शिवाजी विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी घेतली. त्याच वर्षी ते सहायक प्राध्यापक म्हणून रुजू झाले. २०१६ मध्ये ते शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख झाले.आतापर्यंत राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर १५२ संशोधन पेपर प्रसिद्ध झाले आहेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी डॉ. विजय जनार्दन फुलारी यांची छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या (बामू) कुलगुरुपदी नियुक्ती केली आहे तर अमरावतीच्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे नववे कुलगुरू म्हणून नागपूरकर डॉ. मिलिंद बारहाते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. सुनील गंगाधर भिरुड हे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे तंत्रज्ञान विद्यापीठाचे (सीओईपी) नवे कुलगुरु असतील. मंगळवारी राजभवनातून नियुक्तीचे आदेश जारी करण्यात आले आहे.

**...अन् फुलारींनी मारली बाजी**

शोध समितीने टॉप फाइव्हमध्ये पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. संजय ढोले आणि गणित विभागाचे डॉ. विलास खरात, कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. विजय फुलारी व जैवतंत्रज्ञान विभागातील डॉ. ज्योती जाधव व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे डॉ. राजेंद्र काकडे यांची शिफारस केली होती. डॉ. फुलारी व पुण्यातील डॉ. ढोले यांच्यात स्पर्धा सुरू होती. मात्र, अखेरच्या क्षणी डॉ. फुलारी यांनी बाजी मारली. डॉ. ढोले यांच्यासाठी भाजपासंबंधित विद्यापीठ विकास मंच प्रयत्न करीत होता, तर डॉ. फुलारी यांचे नाव उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लावून धरले. त्यात पवार यांची सरशी झाल्याचेच स्पष्ट झाले.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
तरुण भारत

# डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. विजय फुलारी

## राज्यपाल रमेश बैस यांच्या कार्यालयाकडून निवड जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातील डॉ. विजय फुलारी यांची छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड झाली आहे. ही निवड राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी जाहीर केली. त्यांच्या या निवडीबद्दल शिक्षण क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे. राज्यपाल बैस यांच्या कार्यालयाकडून छत्रपती संभाजीनगर, अमरावती व पुणे या तीन विद्यापीठांच्या कुलगुरुंच्या निवडी जाहीर केल्या.

डॉ. विजय फुलारी यांचे बीएस्सी, एमएस्सी, पीएचडी शिवाजी विद्यापीठात झाले आहे. विद्यापीठात भौतिकशास्त्र विभागात ३५ वर्षापासून प्राध्यापक आहेत. सध्या ते वरिष्ठ प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली २५ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. संशोधन क्षेत्रात त्यांचे मोठे कार्य



असून मॉडर्न ऑप्टिक्स हा त्यांच्या संशोधनाचा विषय आहे. यापूर्वी ते भौतिकशास्त्र, युसिक आणि सीएफसी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांचे १५२ हून अधिक संशोधन पेपर प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी नॅक कमिटी सदस्य म्हणून काम केले आहे. त्यांना चार पेटंट मिळाले आहेत. कोरिया, चन्नम, हानयांग विद्यापीठ गेस्ट प्राध्यापक म्हणून काम केले आहे. त्यांनी एक पुस्तक लिहिले आहे. त्यांच्या या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल शिक्षण क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
पुढारी

# आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. फुलारींची नियुक्ती



मुंबई : राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी मंगळवारी डॉ. विजय जनार्दन फुलारी यांची छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी, तर डॉ. मिलिंद अरविंद बारहाते यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती केली.

डॉ. फुलारी हे कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठ भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख होते. तसेच सी. पी. अँड बेरार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बारहाते यांची संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती केली. सर्व कुलगुरूंची नियुक्ती ते पदभार स्वीकारल्याचे दिनांकापासून पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी किंवा संबंधित कुलगुरू वयाची ६५ वर्षे पूर्ण करीपर्यंत - यापैकी जे अगोदर असेल त्या दिनांकापर्यंत करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
लोकसत्ता

# लोकपालपदी निवृत्त न्या. सुधीर कुलकर्णी

कोल्हापूर : प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश (सेवानिवृत्त) सुधीर पुरुषोत्तम कुलकर्णी यांची शिवाजी विद्यापीठाच्या प्रथम लोकपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही माहिती कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी दिली.



विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), नवी दिल्ली यांच्या अधिसूचनेनुसार सर्व विद्यापीठांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष व लोकपाल नियुक्ती करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी सुधीर कुलकर्णी यांची नियुक्ती केली आहे. न्या. कुलकर्णी यांनी बी.एस्सी. (ऑनर्स) व एल.एल.एम. पदवीनंतर अहमदनगर येथे विधी सेवा रुजू केली. नांदेड येथून सत्र न्यायाधीश पदावरून ते सप्टेंबर २०१८ मध्ये निवृत्त झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
लोकमत

# आर. जी. कोरबू यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या पश्चिम विभागीय सचिवपदी प्रा. डॉ. आर. जी. कोरबू यांची बिनविरोध निवड झाली. कानपूर (उत्तर प्रदेश) येथे झालेल्या वार्षिक अधिवेशनात ही निवड झाली. डॉ. कोरबू हे सध्या 'सुटा'च्या कोल्हापूर जिल्हा शाखेचे अध्यक्ष आहेत.

या अधिवेशनासाठी सुटाच्यावतीने प्रा. ए. बी. पाटील, प्रा. सुधाकर मानकर, प्रा. गजानन चव्हाण, प्रा. डॉ. विजय देसाई, प्रा. डॉ. डी. एन. पाटील, प्रा. उत्तम वाघमारे हे अधिवेशनाला गेले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
लोकमत

# अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जानेवारीपर्यंत

कोल्हापूर : एमबीए आणि एमसीएच्या प्रवेशासाठी डीटीईची प्रवेश परीक्षा द्यावी लागते. एमबीए प्रवेश परीक्षेसाठी ३१ जानेवारीपर्यंत अर्ज करण्याची अंतिम मुदत आहे; तर एमसीए प्रवेश परीक्षेसाठी १ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करता येणार आहे. इच्छुक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी www.mahacet.org या वेबसाइटवर जाऊन अर्ज भरावेत, असे आवाहन केआयटीज आयएमईआरचे संचालक डॉ. सुजय खाडिलकर आणि प्रवेशप्रमुख डॉ. प्रवीण जाधव यांनी केले. या वर्षीची एमबीए प्रवेश परीक्षा ९ आणि १० मार्चला होणार आहे. एमसीएची प्रवेश परीक्षा १४ मार्चला होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठाला ३५ कोटींचा निधी देणार – अजित पवार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाला लवकरच ३५ कोटी रुपये निधी देणार आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी सांगितले.

पुणे येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली व पुणे विभागातील पाच जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा नियोजन समित्यांची राज्यस्तरीय आढावा बैठक झाली. या वेळी मुश्रीफ यांनी निधीची मागणी केली.

त्यावर पवार यांनी वित्त विभागाच्या मुख्य सचिवांना सूचना देऊन येत्या अर्थसंकल्पात हा निधी समाविष्ट करण्याचेही सांगितले.

सन २०१४-१५ या शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त विविध शैक्षणिक उपक्रमांकरिता तत्कालीन उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री अजित पवार यांनी ५० कोटी रुपये निधी देण्याची घोषणा केली होती. तो निधी मंजूरही झाला, पण त्यानंतर कोविडसह अन्य कारणांमुळे तो मिळण्यास विलंब झाला. मंजूर ५० कोटींमधील १६ कोटी १० लाख रुपये आत्तापर्यंत मिळालेले आहेत. याबाबतची मागणी आणि पाठपुरावा जिल्हा बँकेचे संचालक व शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेचे माजी सदस्य प्रताप माने, शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेचे माजी सदस्य प्रा. मधुकर पाटील यांनी केला होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024

पुढारी

# विद्यापीठ सेवक संघाचे व्ही.आर.पाटील यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे संस्थापक अध्यक्ष व्ही. आर. पाटील यांना २६ व्या स्मृतिदिनानिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ.पी. एस. पाटील यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखा अधिकारी सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. पी. टी. गायकवाड आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात शारदाबाई पवार अध्यासनाच्या वतीने उद्या चर्चासत्र

कोल्हापूर : भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठ शारदाबाई पवार अध्यासन, राज्यशास्त्र विभाग, गांधी अभ्यास केंद्र व नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ रोजी सकाळी १०.३० वाजता 'भारतीय गणराज्य आणि स्त्रियांचा सहभाग' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्रावेळी पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. विजेत्यांना बक्षिसे दिली जाणार आहेत. चर्चासत्रात सहभागी होण्याचे आवाहन प्रा. डॉ. भारती पवार, प्रा. डॉ. प्रकाश पवार, प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
पुढारी

# हवामान बदल व प्रसारमाध्यमे विषयावर उद्या मास कम्युनिकेशन विभागात कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने दि. २५ जानेवारी रोजी 'हवामान बदल व प्रसारमाध्यमे' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीत ही कार्यशाळा होईल.





पार्थसारथी बिस्वास इरा देऊळगावकर

कार्यशाळेत पुणे येथील इंडियन एक्स्प्रेसचे असिस्टंट एडिटर पार्थसारथी बिस्वास व इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर एन्व्हायर्नमेंट अँड डेव्हलपमेंटच्या प्रकल्प व्यवस्थापक इरा देऊळगावकर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. पार्षद शहा, पेषित शहा या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'पेकिंग ब्लॉक' या शॉर्टफिल्मचे स्क्रिनिंग होणार आहे. कार्यशाळा सर्वांसाठी खुली असून, सहभागींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. पर्यावरण प्रेमी, अभ्यासक, विद्यार्थी तसेच पत्रकारांनी कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
तरुण भारत

# मास कम्युनिकेशनतर्फे उद्या विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने गुरूवार २५ रोजी 'हवामान बदल आणि प्रसारमाध्यमे' या विषयावर एकदिवशीय कार्यशाळा आयोजित केली आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. पुणे येथील इंडियन एक्स्प्रेसचे असिस्टंट एडिटर पार्थसारथी बिस्वास आणि इंटरनॅशनल इन्टीट्यूट फॉर एन्व्हायरमेंट ॲन्ड डेव्हलमेंटच्या प्रकल्प व्यवस्थापक इरा देऊळगावकर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत पार्षद शहा आणि पेषित शहा या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'पेव्हिंग ब्लॉक' शॉर्टफिल्मचे स्क्रिनिंग करण्यात येणार आहे. ही कार्यशाळा सर्वांसाठी खुली आहे. सहभागींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. पर्यावरण प्रेमी, अभ्यासक, विद्यार्थी तसेच पत्रकारांनी या कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन मास कम्युनिकेशचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2024
तरुण भारत

# विद्यापीठात गीतलेखन कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात प्रसिद्ध कवी, गीतकार, पटकथा, संवादलेखक, चरित्र अभिनेते बाबासाहेब सौदागर यांची 'गीतलेखन' या विषयावर कार्यशाळा झाली. कार्यशाळेत त्यांनी आपली कवी, गीतकार, पटकथा, संवादलेखक आणि चरित्र अभिनेता म्हणून झालेली जडणघडण व कलाक्षेत्रातील करावा लागलेला संघर्ष व अनुभवांचा प्रवास उलगडला. विभागप्रमुख डॉ. निखिल भगत यांनी स्वागत केले. डॉ. विनोद ठाकूर--देसाई प्रास्ताविक यांनी केले. अतुल परीट यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.